महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP) अंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील भूस्खलन सौम्यीकरण उपाययोजनांबाबतचे सविस्तर प्रकल्प आराखडा अहवालांच्या तांत्रिक तपासणीसाठी " तांत्रिक मुल्यमापन समिती" (Technical Evaluation Committee) गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)
शासन आदेश क्रमांक :- मंनिक-२०२५/प्र.क्र.१०/ मंनिक-२, (E-१३९३२११)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २३ एप्रिल, २०२६.

वाचा:-

१) विभागाचा शासन निर्णय क्र. आव्यप्र-२०२४/प्र.क्र.३०/ आव्यप्र-१, दि.१३.०३.२०२४.
२) विभागाचे शासन शुध्दिपत्रक क्र. आव्यप्र-२०२४/प्र.क्र.३०/ आव्यप्र-१, दि.१२.०६.२०२४.
३) विभागाचा शासन निर्णय क्र. आव्यप्र-२०२४/प्र.क्र.३०/ आव्यप्र-१, दि.३०.०७.२०२४.
४) राज्य सुकाणू समितीच्या दि.१०.१०.२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
५) राज्य सुकाणू समितीच्या दि.०६.०३.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
६) विभागाचा शासन निर्णय क्र. आव्यप्र-२०२४/प्र.क्र.३०/ आव्यप्र-१, दि.१७.०४.२०२५.

प्रस्तावना:-

कोल्हापूर व सांगली जिल्हयातील कृष्णा आणि भीमा नदी खोऱ्यातील भविष्यातील आपत्ती निवारणासाठी क्षमता बांधणी व पूर व्यवस्थापनासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP) राबविण्याचा निर्णय संदर्भ क्र.(१) च्या शासन निर्णय दि.१३.०३.२०२४ अन्वये घेण्यात आला आहे. तसेच संदर्भ क्र.(३) च्या शासन निर्णय दि.३०.०७.२०२४ अन्वये प्रकल्प अंमलबजावणी व धोरणात्मक दिशा ठरविण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. त्यानूसार मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दि.१० ऑक्टोबर, २०२४ रोजी संपन्न झालेल्या राज्य सुकाणू समितीच्या बैठकीत कोल्हापूर जिल्ह्यातील ८ ठिकाणी भूस्खलन धोक्याचे मूल्यांकन आणि भूस्खलन संरचनात्मक सौम्यीकरण उपाययोजनांसाठी सविस्तर प्रकल्प आराखडा (DPR) तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच दि.६ मार्च, २०२५ रोजीच्या राज्य सुकाणू समितीच्या बैठकीत तांत्रिक सल्लागार सेवा नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र.(६) येथील शासन निर्णय दि.१७ एप्रिल, २०२५ अन्वये रु.१२.०० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर तांत्रिक सल्लागार सेवा संस्थेकडून सादर करण्यात

येणाऱ्या प्रकल्प आराखड्याबाबतचा अहवाल, रेखाचित्रे व अनुषंगिक बाबींची वैज्ञानिक, तांत्रिक अचुकता व प्रमाणीकरण करण्याकरीता शासन स्तरावर तज्ञ तांत्रिक मूल्यमापन समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रमांतर्गत (MRDP) कोल्हापूर जिल्हयातील ८ ठिकाणी भूस्खलन धोक्याचे मूल्यांकन आणि सौम्यीकरण उपाययोजना याबाबतचा सविस्तर प्रकल्प आराखडा (DPR) तयार करण्यासाठी नेमण्यात आलेल्या तांत्रिक सल्लागार संस्थेकडून सादर करण्यात येणाऱ्या प्रकल्प आराखड्याबाबतचा अहवाल, रेखाचित्रे व अनुषंगिक बाबींची वैज्ञानिक, तांत्रिक अचुकता व प्रमाणीकरण करण्याकरीता खालीलप्रमाणे " तांत्रिक मुल्यमापन समिती " (Technical Evaluation Committee) गठीत करण्यात येत आहे.

**" तांत्रिक मुल्यमापन समिती "**

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग | अध्यक्ष |
| २ | निवासी उप जिल्हाधिकारी, कोल्हापूर | सदस्य |
| ३ | कार्यकारी अभियंता, सा.बां.वि., कोल्हापूर | सदस्य |
| ४ | प्रो. ई. चंद्रशेखर, आयआयटी मुंबई. | सदस्य |
| ५ | श्री.मेगोत्शो छेसी, व्यवस्थापक-GSI | सदस्य |
| ६ | प्रो.ब्रिजेश कुमार यादव, हायड्रोलॉजिस्ट,आयआयटी रुरकी | सदस्य |
| ७ | कक्ष अधिकारी/अवर सचिव (मंनिक-०२), आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन | सदस्य सचिव |

०२. तांत्रिक मुल्यमापन समितीची कार्ये पुढीलप्रमाणे असतील-

१. महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रमांतर्गत (MRDP) भूस्खलन उपाययोजनांबाबतचे तांत्रिक अहवाल, रेखाचित्रे, मूल्यांकने आणि प्रकल्प अहवाल प्रदाने यांची तपासणी करणे.

२. तांत्रिक गुणवत्ता आणि वैज्ञानिकदृष्टया अखंडता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यकतेनुसार सूचना, शिफारशी करणे.

३. आवश्यकतेनुसार अतिरिक्त माहिती, प्रमाणीकरण आणि सुधारणांबाबत माहिती मागविणे व सल्ला देणे.

४. विभागाला विहित मुदतीत एकत्रित तांत्रिक अहवाल सादर करणे.

सदर समिती आवश्यकतेनुसार अन्य तज्ञांना विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित करु शकते. त्यासाठी प्रवास भत्ता/दैनिक भत्ता आणि मानधन आवश्यकतेनुसार व शासकीय नियमांनुसार दिले जाईल.

०३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४२३११३१४६५४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by BAGUL SMITA SANJAY
Date: 2026.04.23 11:32:46 +05'30'

**(स्मिता बागुल)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति**

१) मा. मंत्री (आपत्ती व्यवस्थापन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
२) प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र.
४) जिल्हाधिकारी, कोल्हापूर
५) संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई
६) निवासी उप जिल्हाधिकारी, कोल्हापूर
७) कार्यकारी अभियंता, सा.बां.वि., कोल्हापूर
८) प्रो. ई. चंद्रशेखर, आयआयटी मुंबई.
९) श्री.मेगोत्शो छेसी, व्यवस्थापक-GSI
१०) प्रो.ब्रिजेश कुमार यादव, आयआयटी रुरकी
११) निवडनस्ती, मंनिक - ०२.